# दलितांची शैक्षणिक सामाजिक परिस्थिती

म्हैशाळ गावात दलीतांची स्थिती पूर्वीपासून गरीबीची होती. त्यामुळे दलीतांचा शैक्षणिक विकास पूर्वीपासून झालेला दिसत नाही. पूर्वी दलीतांच्या मुलांना अस्पृश्य म्हणून शाळेच्या बाहेर बसावे लागत असे. सवर्णांची मुले अस्पृश्यांच्या मुलाबरोबर खेळत नसत तसेच कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसत. शिक्षकही दलीतांच्या मुलाना सहकार्य करीत नसत त्याच्याकडे विशेष लक्ष देत नसत. त्यामुळे दलीतांची मुले ही शिक्षणासाठी काळजीपूर्वक शाळेला जाण्यास टाळाटाळ करीत. कारण त्यांना शाळेमध्ये तुच्छतेची वागणूक मिळत असे व शिक्षणासाठी वह्या, पुस्तके इत्यादी साहित्य मिळत नसे. त्याचा परिणाम दलीतांची मुले शाळेत जाण्याचे कमी झाली. पुढे भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर घटनेमध्ये शिक्षणाचा मुलभूत हक्कात अधिकार दिला. त्यानुसार सर्व जातीच्या मुलाना सरकारी शाळेमध्ये प्रवेश मिळाला. दलीतांची मुले ही शाळेत जाऊ लागली. तरीही अस्पृश्यता पूर्णपणे गेलेली नव्हती. तात्कालीन समाज व्यवस्थेनेही अस्पृश्यांना गाव कुसाच्या बाहेरच ठेवले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सातेच्या चळवळीचा प्रसार झाल्याने दलीतांना सवर्णांच्या विरुध्द बौध्दीक क्षेत्रात संघर्ष करुन शैक्षणिक हक्कासाठी आजही संघर्ष करावा लागत आहे.

विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी स्थापना झाली. सोसायटीने आपल्या उद्दिष्टामध्ये दलीतांचा शैक्षणिक विकास करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले, त्यानुसार सोसायटीने शिक्षण प्रसारासाठी दोन बालवाड्यांना आर्थिक सहाय्य दिले. १] राजर्षि शाहू बालवाडी. २] महात्मा फुले बालवाडी या दोन बालवाडया चालविल्या जातात.

१] राजर्षि शाहू बालवाडी :-

विठ्ठल सोसायटीने दलीतांच्या मुलांना शाळा शिकण्याचे वळण लागावे म्हणून बालवाडी स्थापली या बालवाडीस जिल्हा परिषदेचे अनुदान मिळून व सोसायटीच्या मदतीने बालवाडी चालवण्यास मदत केली. त्यासाठी प्रशिक्षीत शिक्षीका नेमली. तसेच एक मदतनीस बाई नेमली. दलीतांच्या मुलांना जिल्हा परिषदेच्या सौजन्याने सकस आहार, सकस दूधाची योजना राबविली. त्याद्वारे दलीतांच्या मुलांना सकस आहार व दूध मिळू लागल्याने बालवाडीत त्या आशेने शाळा शिकण्यास येऊ लागली आज बालवाडीत जवळ जवळ ५० मुलेमुली शिकतात.

२] महात्मा फुले बालवाडी -

महात्मा फुले ही बालवाडी जिल्हा परिषद तसेच सोसायटीच्या सहकार्याने चालविली जाते. बालवाडीत एकूण ५० मुले शिक्षण घेतात या बालवाडीत दलीतांची बहूसंख्य बालके जातात. या बालवाडीत प्रशिक्षीत शिक्षीका नेमली आहे येथे ही बालकाना सकस आहार दूध दिले जाते.

विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या सहकार्याने दलीतांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत दिली जाते. सोसायटीने प्रत्येकी तीनशे रूपये या प्रमाणे बारा विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली. तसेच सोसायटी शैक्षणिक शिबीरे, मेळावे, इत्यादी उपक्रमाद्वारे दलीतांच्यामध्ये शैक्षणिक जाणिव जागृत व्हावी यासाठी वेळोवेळी प्रयत्न करीत असते. तसेच दलीतांना दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणारे ज्ञान मिळावे या हेतूने प्रौढ शिक्षण योजना सोसायटी व जिल्हा परिषदामार्फत दलीत वस्तीत रात्रीची प्रौढ शाळा चालविली जाते त्यात निरक्षर सभासदांना साक्षर करण्याचे कार्य चालते.

विठ्ठल सोसायटीच्या उपक्रमाद्वारे दलीतांना शैक्षणिक विकासासाठी तसेच साक्षर बनविण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. म्हैशाळ - येथील दलीत सभासदांच्या मुलामध्ये शिक्षणाचा थोडा फार विकास अलिकडे झालेला दिसतो. तसेच दलीतामध्ये शिक्षणाची जाणिव निर्माण झाली आहे. दलीतांमध्ये शिक्षणाची जाणिव निर्माण झाली आहे. दलीतांना शैक्षणिक विकासाशिवाय कोणताही विकास होऊ शकत नाही हे कळाल्याने दलीत आता मुलाना शाळेला पाठवू लागले. दूधाच्या व्यवसायापासून तुटपुंजे उत्पन्नासाठी दलीतांच्या मुलाना जनावरांच्या देखभालीसाठी शाळा सोडावी लागली. तर काही मुले शाळेलाच गेलेली नाहीत. परंतु अलिकडे सन १९८५ ते १९८९ सालात म्हैशाळ येथील दलीतांच्या मुलामध्ये शाळेला जाण्याचे प्रमाण वाढलेले दिसते ते खालील आकडेवारीनुसार

| दलीतांची एकूण मुले. | शाळेत जाणारी एकूण मुले | शाळेत न जाणारी एकूण मुले | शाळा अर्ध्यावरच सोडलेले मुले. |
|---|---|---|---|
| ३२६ | १०६ | ८० | ४० |

शाळेत जाणारी मुलांची वर्गवारी.

| प्राथमिक शाळेत जाणारी | | माध्यमिक शाळेत जाणारी | | कॉलेजमध्ये जाणारी | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| ५० | ३९ | १२ | ३ | २ | – |

सोसायटीच्या दलीत सभासदांची एकूण ३२६ मुलापैकी १०६ मुले

शाळामध्ये शिकतात त्यातील प्राथमिक शाळेत ८९ मुले मुली शिकतात. माध्यमिक शाळेत १५ मुले मुली तर कॉलेज मध्ये फक्त दोन मुले जातात. वरील आकडेवारीवरुन असे दिसते की अलिकडे दलीतांच्या एकूण मुलामध्ये ५०% मुले शिक्षण घेतात. त्यात प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा-याचे प्रमाण जास्त आहे तर माध्यमिक व कॉलेजचे शिक्षण घेण्याचे प्रमाण म्हणावे तसे वाढलेले नाही यावरुन सोसायटी स्थापून जवळ जवळ वीस वर्षे झाली तरी म्हैशाळ मधील दलीतांच्या मुलाचे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले नाही. एकूण मुलामध्ये म्हणजे २२६ मुलापैकी १२० मुले अर्ध्यावरच शाळा सोडलेली असेच शाळेला न गेलेली मुले आहेत.

वरील विवेचनावरुन असे दिसते की दलीतांच्या सन १९६९ ते १९८९ पर्यन्त दलीतांच्या मुलामध्ये एकूण मुलात ५०% मुले प्राथमिक व बालवाड्यात शिक्षण घेऊ लागली तर फक्त १५ टक्के मुले माध्यमिक व दोनच टक्के मुले महाविद्यालयीन शिक्षण घेतात.

सोसायटीच्या व्यवस्थापनात व प्रवर्तकाच्या मते "शेतीमुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होतेच त्यामुळे सोसायटीतील सभासदांच्या मुलामध्ये शिक्षणाविषयी उदासिनता आली असेल " पुढे असेही म्हणतात कि " खेडे गावात जो चांगली शेती करतो त्याजला मान मिळतो प्रतिष्ठा मिळते "

वरील प्रवर्तकाच्या वक्तव्यामुळे दलीतावर परिणाम झालेला दिसतो. त्यामुळे दलीतांनी आपली सारी शक्ती शेती कसण्यात लावली व शेतीत उत्पादन काढले परंतु उलट दलीतांनी आपल्या मुलाकडे विशेष लक्ष दिले नाही. सोसायटीच्या सहकार्याने दलीतांना कामे मिळू लागली. त्यामुळे दलीतांची मुले ही शेतीत कामे करु लागली. तसेच सोसायटीने दिलेल्या जर्सी गायींच्या देखभालीसाठी कित्येक दलीतांच्या मुलांना शिक्षणापासून

वंचित रहावे लागले. आर्थिक सुबत्तेसाठी निर्माण झालेला हा शेती प्रकल्प दुबळ्या दलीत घटकांना फारसा विकासाचा हात देऊ शकला नाही.

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची आणि योजनांची अंमल बजावणी करण्याचे कार्य समाजकर्ते करीत असतात. जाती व्यवस्था, अस्पृश्यता, देवदासी प्रथा, दारु व्यसनमुक्ती अंधश्रध्दा, दारिद्र्य इत्यादी प्रचलीत रुढी परंपरांच्या अवस्थेत सापडलेल्या दलीत समाजाला विषमतेला तोंड द्यावे लागते. समाज परिवर्तन केवळ प्रबोधनाने होत नसून त्यासाठी चळवळ उभी करावी लागते. तसेच संघटितपणे कोणतेही कार्य केल्यास समाज परिवर्तन होण्यास वाव मिळतो.

१] देवदासी प्रथा -

देवदासीची अनिष्ट पध्दत म्हैशाळ गावात दलीतामध्ये फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. गावात यल्लमाचे देऊळ आहे. अस्पृश्यांमध्ये देवीची उपासना करतात तसेच महार, मातंग, चांभार, अशा जातीतील लोक आपल्या मुली देवीला सोडीत विशेषत: महार जातीतील दलीत लोक आपल्या मुली देवदासी बनवत असत. या जातीचा प्रघात मोठ्या प्रमाणावर देवदासी सोडण्याचा आहे. देवीला सोडलेली मुलगी ही अविवाहीत राहते या मुलीच्या गळ्यात फक्त देवाच्या नावाने रंगमुळा घातले जाई. या मुलीचे देवाबरोबर लग्न लावतात. ही प्रथा बंद व्हावी यासाठी विठ्ठल सोसायटीने फारसा प्रयत्न केलेला दिसत नाही, कारण म्हैशाळमध्ये आजही दलीत देवदासी वस्त्यांमधून डोक्यावर जग घेऊन फिरताना दिसतात ही प्रथा बंद व्हावी आणि देवदासीचे पूनर्वसन व्हावे यासाठी शासनाने अनेक सवलती आर्थिक सहाय्य उद्योगधंदे, शिक्षण देण्याच्या योजना आखल्या आहेत परंतु देवदासीची प्रथा पूर्णपणे बंद झालेली नाही. पूर्वी महार कुटूंबात एक तरी देवदासी असायचीच,

जुन्या पिढीतील म्हैशाळ येथील दलीतामध्ये तीस टक्के देवदासींच्या पोटी जन्मलेली मुली होती. आता प्रमाण अगदीच कमी राहिले आहे. देवदासींची संख्या ही घटलेली दिसते. विठ्ठल सोसायटीने देवदासीच्यासाठी पुढाकार घेऊन देवदासींना शेती प्रकल्पात काम देण्याचे मान्य केले. त्याना अग्रहक्काने काम देण्याचे ठरले परंतु काम करण्याची सवय नव्हती त्यामुळे ब-याच देवदासी शेतमजुरीच्या कामास तयार होईनात. देवदासींना इतर मार्गाने ही आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न झाला. परंतु या सर्व धोरणांचा फारसा परिणाम देवदासीच्यावर झालेला नाही. देवदासीची प्रथा म्हैशाळमध्ये पूर्णपणे नष्ट झालेली नाही हे पाहणीत आढळून आले.

दारु मुक्ती :-

सोसायटी पूर्वी म्हैशाळच्या दलीतामध्ये दारु पिण्याचे वेसण फार मोठ्या प्रमाणात होते. दारुच्या व्यसनाला आळा बसावा म्हणून सोसायटीने दारु बंदीचा कार्यक्रम हाती घेतला व दारु पिणा-या सभासदास सहकार्य करायचे नाही असे ठरविल्यानंतर दारु पिणे दलीतामध्ये कमी झाले. परंतु दारुचे व्यसन पूर्णपणे नष्ट झालेले दिसत नाही.

बाल विवाह पध्दती :-

पूर्वीपासून म्हैशाळ येथील अस्पृश्यामध्ये बालविवाह होत आले आहेत. अलिकडे बाल विवाह होत नाहीत, बालविवाह करणे कायद्याने बंदी घातल्याने म्हैशाळ येथील दलीतामध्ये बालविवाह ही प्रथा आढळली नाही.

आंतरजातीय विवाहात तरुणांची भूमिका :-

सोसायटीमधील तरुण कार्यकर्ते व सुशिक्षीतामध्ये विवाहाविषयी पुरोगामी विचाराची वाढली. आंतरजातीय विवाहाविषयी तरुणांमध्ये मतभेद दिसतात. कारण म्हैशाळ येथील दलीत इतर दलीतामध्ये सामंजस्य

एकता, तसेच दलीत इतर दलीत यांच्यामध्ये बेटी व्यवहार होत नसल्याचे जाणवले.

विठ्ठल सहकारी शेती प्रकल्पामुळे दलीतांना निरनिराळ्या अभ्यासकांच्या भेटी शिबीरे अभ्यास मंडळे यामुळे वरील सर्व रूढी, परंपरा याविषयी माहिती मिळत असल्याचे दलीतांना सामाजिकबद्दल जाणवतो. विधवा विवाहास मान्यता दिल्याचे जाणवते. म्हैशाळ येथील दलीत तरुणांनी तसेच प्रौढांनीही विधवा विवाहाची प्रथा सुरु व्हावी अशी मते मांडली कारण ऐन तारुण्यात एखाद्या स्त्रीचा नवरा मेला असेल तर तिला उर्वरित आयुष्य दुःखात कंठावे लागते म्हणून विधवा विवाहास अनुकूल मते मिळाली.

सामाजिक सांस्कृतिक उत्सव -

दलीतामध्ये अजून धार्मिक, अंधश्रध्दा धर्मभोळेपणा आढळतो. उदा. देवाला नवस करणे, कोंबडी, बकरे बळी देणे, देवीला मुली सोडणे, इत्यादी प्रथा नष्ट झालेल्या नाहीत. सोसायटीच्या सभासदांमध्ये अजून "यल्लमा यात्रा" करतात. गणेशोत्सव पंढरपूर आषाढी एकादशी करतात. म्हैशाळ येथील दलीतांना विठोबाला दैवत मानले असल्याने पंढरपूर यात्रेला जातात.

विठ्ठल सहकारी संयुक्त शेती सोसायटीने सन १९८२ मध्ये स्त्रियासाठी सावित्रीबाई फुले महिला मंडळ स्थापन केले. त्याद्वारे दलीत स्त्रिसाठी - प्रौढ शिक्षण वर्ग व शिवण क्लास वर्ग तसेच बचत म्हणून स्त्रियांनी भिशी मंडळही सुरु केले. आहे. या महिला मंडळाद्वारे गृहस्वच्छता मोहीम मंडळामुळे स्त्रियां-मध्ये जाणिव जागृती होऊ लागली आहे. तसेच वेगवेगळ्या शिबीरे इत्यादीद्वारे शेतीची उत्पादने कशी वाढवावी रासायनिक खतांचा वापर कसा करावा नगदी

BARR. ... KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पिके कशी घ्यावी शेतीची कामे याविषयी सोसायटी शिक्षण देते.

भिमराव भजनी मंडळ -

सोसायटीने सभासदामध्ये एकता प्रस्थापित होण्यासाठी, तसेच धार्मिक भक्तीभाव निर्माण होण्यासाठी भजनी मंडळ स्थापन केले. त्याद्वारे अभंग, गौळण इत्यादी भक्तीगीते गायली जातात. भजनी मंडळात स्त्रियांचा ही सहभाग असतो. भजनी मंडळाद्वारे सामाजिक, धार्मिक एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न असतो.

भिमराज व्यायाम मंडळ -

विठ्ठल सहकारी सोसायटीच्या सहकार्याने म्हैशाळ येथील दलीत तरुण युवकांच्यामध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, तरुणांमध्ये संघटितपणा एकात्मता, कार्यक्षमता निर्माण व्हावी यासाठी विठ्ठल सहकारी सोसायटीने भिमराव व्यायाम मंडळ स्थापन केले.

म्हैशाळ गावात अलिकडच्या काळात अनेक घडामोडी घडून आल्या आहेत. एक म्हणजे जातीयवादी, सांप्रदायिक संघटनांचा उदय त्यामध्ये प्रामुख्याने हिंदू एकता, शिवसेना, वीर सेवादल, दलीत पँथर, इत्यादी संघटनांचा उल्लेख करावा लागेल.

हिंदू एकता ही संघटना हिंदूत्व वादीसाठी सावरकरांचा प्रतीक म्हणून स्विकार करते. तसेच शिवसेना ही हिंदूत्व वादीसाठी शिवाजी महाराजांचा प्रतीक म्हणून स्विकार करते. वीर सेवा दल ही संघटना महावीरांचा प्रतीक म्हणून स्विकार करते. दलीत पंथर ही संघटना सामाजिक अन्यायासाठी दलीतांनी स्थापल्याचे दिसते. अन्यायाविरुध्द आवाज उठविण्यासाठी दलीतांची दलीत पँथर संघटना कार्य करते. इत्यादी संघटनांचे बोर्ड म्हैशाळ गावात लावल्याचे जाणवले तसेच दलीत कार्यकर्त्यानेही

वरील संघटनाद्वारे तणाव निर्माण झाल्याचे सांगीतले. परंतु प्रत्यक्ष विरोध जाणवत नसल्याचे जाणवले. वरील माहिती एका दलीत कार्य-कर्त्याने कथन केली व गावात संघटनांचे बोर्ड असल्याचे आम्हास आढळून आले.

वरील विवेचनावरुन म्हैशाळमध्ये दलीत दलीतेतरात उघड उघड संघर्ष होत नसला तरी धुमस्ता तणाव आहे असे दिसते. दलीत पँथर मध्ये एक गोष्ट आवर्जून लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे दलीत पँथरमध्ये श्री विठ्ठल सहकारी सोसायटीचे सभासद कोणीही नाहीत. याचे कारण पूर्वीपासून दलीत हे सांप्रदाय वादी विचाराचे होते " विठ्ठल " हे दैवत मानणारे होते. तसेच दलीतांचे पूर्वज वारकरी पंथाचे होते म्हणून विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीने भिमराज भजनी मंडळ स्थापन केले.

वरील प्रकारच्या अनेक सुधारणा, उपक्रम सोसायटीने सुरु केल्या, परंतु त्याचा परिणाम दलीतांवर फारसा झाला नाही. सोसायटीने सामाजिक एकात्मता हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवले होते. त्याप्रमाणे सामाजिक एकता निर्माण झाली नाही. उलट दलीतामध्ये व सवर्णामध्ये सामाजिक तणाव निर्माण झाला. आमच्या अभ्यास पाहणीत वरील - प्रकारच्या सुधारणा सोसायटीने चालू केल्याचे आढळले. विठ्ठल सोसायटीने सामाजिक परिस्थितीत बदल करण्याचे उद्दीष्टात म्हटले आहे. परंतु दलीत मुक्तीच्यादृष्टीने सोसायटीचा मर्यादितच प्रयत्न झाला आजची सामाजिक विषमता सर्व दृष्टीने सुकीच्या सबुतीवर आधारलेली आहे. ही सामाजिक विषमता दूर करण्यासाठी दलीतांना त्यांच्या हक्काची जाणिव जागृत करण्यासाठी संघटितरित्या। सामाजिक अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा इत्यादी दूर करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी

सहकार्य करण्यास तयार झाले पाहिजे तसेच समाज प्रबोधन केले पाहिजे.